14 APR 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कदम बंधूंनी ज्ञानगंगा गरिबांपर्यंत नेली

## खासदार श्रीनिवास पाटील : शिवाजीराव कदम यांचा कणबरकर पुरस्काराने सन्मान



शिवाजी विद्यापीठाचा प्राचार्य रा.कृ. कणबरकर पुरस्कार भारती अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम यांना खासदार श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते गुरुवारी विद्यापीठात झालेल्या शानदार समारंभात प्रदान करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, कुलसचिव डॉ. विलास शिंदे व प्राचार्य डॉ. बाबासाहेब खोत उपस्थित होते. (छाया : आदित्य वेल्हाळ)

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** गरीब आई-बापाच्या पोटी जन्मलेल्या पतंगराव आणि शिवाजीराव कदम या बंधूंनी स्वतः अथक परिश्रम करीत शिक्षण घेतले आणि प्रगती साधली. मात्र, त्यांनी ही प्रगती स्वतःपुरती न राखता समाजातील अन्य गोरगरीब घटकांतील विद्यार्थ्यांपर्यंत ज्ञानाची गंगा नेली, असे गौरवोद्गार सिक्कीमचे माजी राज्यपाल, खासदार श्रीनिवास पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या शाहू सभागृहात सोमवारी सहावा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम यांना पाटील यांच्या हस्ते देण्यात आला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व्यासपीठावर उपस्थित होते.

श्रीनिवास पाटील म्हणाले, पतंगराव आणि शिवाजीराव कदम या बंधूंनी अथक परिश्रम करीत शिक्षण घेऊन प्रगती साधली. मात्र, त्यांनी ही प्रगती स्वतःपुरती न राखता समाजातील अन्य गोरगरीब घटकांतील विद्यार्थ्यांपर्यंत घेऊन जाण्याचा चंग बांधला. त्यातून भारती विद्यापीठाचा वटवृक्ष निर्माण झाला आणि देशभर पसरला. शिवाजीरावांमध्ये विविध समाज-घटकांप्रति खूप कणव आणि जिव्हाळा आहे. आज या प्रसंगी पतंगराव असते, तर त्यांनी हा सोहळा डोळे भरून पाहिला असता आणि त्यांचे डोळे पाणावले असते. या दोघाही बंधूंच्या कर्तृत्वाचा यथोचित गौरव शिवाजी विद्यापीठाने केला, ही समाधान देणारी बाब आहे.

डॉ. शिवाजीराव कदम म्हणाले, पतंगराव व मी या विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आहोत. त्यामुळे विद्यापीठाने आपल्या विद्यार्थ्यांचा केलेला हा गौरव सामाजिक प्रतिष्ठा वाढविणारा आहे. हा पुरस्कार भारती विद्यापीठातील सर्व सहकाऱ्यांना अर्पण करतो.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, विद्यापीठाच्या माजी कुलगुरूंच्या नावे असणारा एकमेव व सर्वोच्च मानाचा कणबरकर पुरस्कार माजी विद्यार्थ्यास देण्यात येत असल्याचा अभिमान वाटतो. ज्यांना पुरस्कार मिळाला ते सांगलीचे, ज्यांनी पुरस्कार दिला ते सातारचे आणि जेथे हा सोहळा झाला तो कोल्हापुरात या योगायोगाने हा खऱ्या अर्थाने शिवाजी विद्यापीठाचा सोहळा झाला आहे.

प्राचार्य डॉ. बाबासाहेब खोत यांनी प्रास्ताविक केले. डॉ. भालबा विभुते यांनी मानपत्राचे वाचन केले. कणबरकर कुटुंबीयांतर्फे डॉ. अरुण कणबरकर यांनी डॉ. कदम यांचा सत्कार केला. नंदिनी पाटील आणि धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

### बागल विद्यापीठाला पाच लाखांची देणगी

डॉ. कदम यांना शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, मानपत्र, ग्रंथभेट, पुष्पगुच्छ व एक लाख ५१ हजारांचा धनादेश दिला. या पुरस्काराच्या रकमेत भर घालून एकूण पाच लाखांची देणगी डॉ. शिवाजीराव कदम यांनी भाई माधवराव बागल विद्यापीठासाठी डॉ. जयसिंगराव पवार यांच्याकडे सुपूर्द केली. 'आपल्या उमद्या स्वभावाला धरूनच आपले हे कृत्य आहे,' असे कौतुकोद्गार डॉ. पवार यांनी काढले.

### पुरस्कारांच्या रकमा समाजासाठी

कणबरकर पुरस्कार आतापर्यंत ज्यांना मिळाला आहे, त्या डॉ. एन.डी. पाटील, डॉ. डी.वाय. पाटील व आता डॉ. कदम यांनी या रकमेत स्वतःकडील भर घालून ती समाजासाठी दान केली.

14 APR 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## श्रीनिवास पाटील; भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम यांचा गौरव

# कणबरकर पुरस्कारातून दातृत्वाची परंपरा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १३ : शिवाजी विद्यापीठाच्या प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्काराने दातृत्वाची परंपरा निर्माण केली आहे, असे प्रतिपादन सिक्कीमचे माजी राज्यपाल व खासदार श्रीनिवास पाटील यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार-२०२३ त्यांच्या हस्ते भारती अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम यांना देण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, मानपत्र, ग्रंथभेट, पुष्पगुच्छ व एक लाख ५१ हजार रुपयांचा धनादेश असे या पुरस्काराचे स्वरूप होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. राजर्षी शाहू सभागृहात हा कार्यक्रम झाला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार भारती अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम यांना खासदार श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या वेळी डावीकडून प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास शिंदे व प्राचार्य डॉ. बाबासाहेब खोत.

श्री. पाटील म्हणाले, ''विद्यापीठाच्या स्थापनेपासूनचा मी साक्षीदार आहे. फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांची परंपरा पुढे वाहून नेणारे अनेक पाईक या भूमीमध्ये निर्माण झाले. त्यांच्या समृद्ध विचारांची परंपरा शिवाजी विद्यापीठ पुढे चालवत हीरक महोत्सव साजरा करत आहे, याचा अभिमान वाटतो. कणबरकर पुरस्कारप्राप्तची बहुतांश मान्यवरांनी आपल्याला मिळालेली पुरस्काराची रक्कम ही पुन्हा जनहितार्थ पुढे दानच केल्याचा इतिहास आहे.''

ते म्हणाले, 'कष्टकरी आई-बापाच्या पोटी जन्मलेल्या पतंगराव व शिवाजीराव कदम बंधूंनी अथक परिश्रम करत शिक्षण घेतले आणि प्रगती साधली; मात्र त्यांनी ही प्रगती स्वतःपुरती न राखता समाजातील अन्य गोरगरीब घटकांतील विद्यार्थ्यांपर्यंत घेऊन जाण्याचा चंग बांधला. त्यातून भारती विद्यापीठाचा वटवृक्ष निर्माण झाला आणि तो देशभरात फोफावला. आज पतंगराव असते तर त्यांनी हा सोहळा डोळे भरून पाहिला असता.' डॉ. कदम म्हणाले, ''बंधू पतंगराव व मी शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आहोत. त्यामुळे विद्यापीठाने विद्यार्थ्यांचा केलेला हा गौरव आहे, अशी माझी भावना आहे.''

यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, माजी प्र-कुलगुरू डॉ. व्ही. एम. चव्हाण, डॉ. बी. पी. साबळे, डॉ. बी. एम. हिर्डेकर, प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, प्रा. डी. यु. पवार, प्राचार्य रा. तु. भगत, प्राचार्य प्रकाश कुंभार, डॉ. नमिता खोत, डॉ. अंजली साबळे उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. बाबासाहेब खोत यांनी प्रास्ताविक केले. डॉ. भालबा विभूते यांनी मानपत्राचे वाचन केले. नंदिनी पाटील व धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

### बागल विद्यापीठास पाच लाख एक रुपयांची देणगी

■ डॉ. कदम यांनी पुरस्काराच्या एक लाख ५१ हजार रुपयांच्या रकमेत भर घालून कोल्हापूरच्या भाई माधवराव बागल विद्यापीठास पाच लाख एक रुपयांची देणगी जाहीर केली. बागल विद्यापीठाचे कार्यकारिणी सदस्य ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी देणगीचा स्वीकार केला. 'आपल्या उमद्या स्वभावाला धरूनच आपले हे कृत्य आहे' या शब्दांत डॉ. पवार यांनी डॉ. कदम यांचे कौतुक केले.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 APR 2023 पुढारी

# प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार प्रेरणादायी : खा. श्रीनिवास पाटील




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार डॉ. शिवाजीराव कदम यांना प्रदान करताना खा. श्रीनिवास पाटील. डावीकडून डॉ. प्रमोद पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास शिंदे व डॉ. बाबासाहेब खोत. (छाया : नाज ट्रेनर)

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार हा शिक्षणाचा देशभर प्रसार करणाऱ्या भारती विद्यापीठासाठी प्रेरणादायी ठरणारा आहे, असे गौरवोद्‌गार सिक्कीमचे माजी राज्यपाल व खासदार श्रीनिवास पाटील यांनी काढले. शिवाजी विद्यापीठाचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार भारती अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम यांना खा. पाटील यांच्या हस्ते गुरुवारी प्रदान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. शाल, श्रीफळ मानपत्र व रोख दीड लाख रुपये असे पुरस्काराचे स्वरूप होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्काराच्या निमित्ताने विद्यापीठाने दातृत्वाची परंपरा निर्माण केल्याचे सांगून श्रीनिवास पाटील म्हणाले, लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या संकल्पनेतून विद्यापीठ उभे राहिले. फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांची परंपरा पुढे नेत विद्यापीठ हीरकमहोत्सव साजरा करीत आहे.

सत्काराला उत्तर देताना डॉ. शिवाजीराव कदम म्हणाले की, हा पुरस्कार सामाजिक प्रतिष्ठा वाढवणारा आहे. बंधू पतंगराव आणि मी दोघेही शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी. त्यामुळे विद्यापीठाने आपल्या विद्यार्थ्याचा केलेला हा गौरव माझ्यासाठी आनंदाचा असून, हा पुरस्कार भारती विद्यापीठातील माझ्या सर्व सहकाऱ्यांना अर्पण करतो. राज्यातील प्रत्येक विद्यापीठासाठी शिवाजी विद्यापीठ आदर्शवत आहे.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिर्के यांनी, विद्यापीठाच्या माजी कुलगुरूंच्या नावे असणारा एकमेव आणि सर्वोच्च मानाचा कणबरकर पुरस्कार माजी विद्यार्थ्यास देण्यात येत असल्याचा अभिमान वाटतो. त्यांनी स्वकर्तृत्वाने इथपर्यंत मजल मारली, त्यामुळेच एकमताने त्यांची यासाठी निवड झाल्याचे त्यांनी सांगितले.

स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. बाबासाहेब खोत यांनी केले. डॉ. भालबा विभूते यांनी मानपत्राचे वाचन केले. नंदिनी पाटील व धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

यावेळी प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. अरुण कणबरकर, माजी प्र-कुलगुरू डॉ. व्ही. एम. चव्हाण, बी. पी. साबळे, बी. एम. हिर्डेकर, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. डी. यू. पवार तसेच प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

## भाई माधवराव बागल विद्यापीठास पाच लाखांची देणगी

यावेळी डॉ. कदम यांनी पुरस्काराच्या एक लाख ५१ हजार रुपयांच्या रकमेमध्ये भर घालून कोल्हापूरच्या भाई माधवराव बागल विद्यापीठास पाच लाख एक रुपयांची देणगी जाहीर केली. बागल विद्यापीठाचे कार्यकारिणी सदस्य ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी या देणगीचा स्वीकार केला. आपल्या उमद्या स्वभावाला धरूनच आपले हे दातृत्व आहे, असे कौतुकोद्‌गार डॉ. पवार यांनी डॉ. कदम यांच्याविषयी काढले.

14 APR 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचे नाव जागतिक पातळीवर

## खासदार श्रीनिवास पाटील : भारती विदयापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम यांना कणबरकर पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी
कोल्हापूर

छोटेखानी स्थापन झालेल्या शिवाजी विद्यापीठाचा विस्तार व दर्जेदार शिक्षण पाहून माजी विद्यार्थी म्हणून मला अभिमान आहे. तसेच कुलगुरुंच्या नावे एका माजी विद्यार्थ्याला पुरस्कार मिळतो ही आनंदाची गोष्ट आहे. शिवाजी विद्यापीठाने जागतिक पातळीवर आपले नाव सुवर्णाक्षरांनी कोरले आहे, असे प्रतिपादन खासदार श्रीनिवास पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने दिल्या जाणाऱ्या प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्काराने भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम यांना खासदार श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते गौरवण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के होते. प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

खासदार पाटील म्हणाले, प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांनी भाई माधवराव बागल विद्यापीठाची स्थापना केली. हे विद्यापीठ अडचणीत असताना पुरस्कारप्राप्त डॉ. कदम यांनी पुरस्काराच्या रक्कमेत भर घालून पाच लाख रुपयांची देणगी भाई माधवराव बागल विद्यापीठाला दिली. त्यांचे दातृत्व पाहून माजी मंत्री स्व. पतंगराव कदम यांची आठवण झाली. त्यांनी भारती विद्यापीठाच्या माध्यमातून देशभर हजारो डॉक्टर, इंजिनिअर, वकील घडवले. अशा विद्यापीठाच्या कुलपतींना कणबरकर पुरस्कार देवून सन्मानित केले आहे.

सत्काराला उत्तर देताना भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम म्हणाले, रा. कृ. कणबरकर यांनी शिक्षण क्षेत्रात आपले आयुष्य वेचले. विद्यार्थीप्रिय व शिस्तबध्द प्राचार्य, कुलगुरु म्हणून त्यांची ओळख होती. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारांचा पगडा त्यांच्यावर होता. त्यांनी आपल्या लिखाणातून शाहूंचे कार्य जगभर पोहचवले. शिवाजी विद्यापीठाला नॅकच्या एप्लसप्लस मानांकनासह ९२ संशोधकांनी जागतिक पातळीवरील क्रमवारीत स्थान निर्माण केले, ही अभिमानाची गोष्ट आहे.

अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलगुरु डॉ. शिर्के म्हणाले, माजी कुलगुरुंच्या नावाने माजी विद्यार्थ्याला पुरस्कार मिळणे योगायोग आहे. आतापर्यंतच्या पुरस्कारप्राप्त मान्यवरांनी या



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम यांना प्रदान करताना खासदार श्रीनिवास पाटील. सोबत प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्राचार्य डॉ. बाबासाहेब खोत.

### बागल विद्यापीठाला दिले पाच लाख

प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांच्या नावाने मला मिळालेला पुरस्कार मी भारती विद्यापीठाला अर्पण करतो. तर भाई माधवराव बागल विद्यापीठाला मला मिळालेल्या रकमेत माझे पैसे घालून ५ लाखांची देणगी देतो, असे जाहीर करून ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्याकडे डॉ. कदम यांनी पाच लाखांचा चेक सुपुर्द केला.

पुरस्काराची रक्कम विधायक कार्याला दिल[...] आहे. हे या पुरस्काराचे वैशिष्ट्यच म्हणा[...] लागेल. डॉ. शिवाजीराव कदम यांच्या कार्याच[...] दखल घेवून निवड समितीने एकमताने [...] पुरस्कारासाठी त्यांची निवड केली.

सन्मानपत्राचे वाचन डॉ. भालबा विभुते यां[...] केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. बाबासाहेब खो[...] यांनी केले. सूत्रसंचालन धैर्यशील यादव आ[...] नंदिनी पाटील यांनी केले. कुलसचिव डॉ. [...] एन. शिंदे यांनी आभार मानले.

14 APR 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तापमान वाढ रोखण्याची गरज : प्र. कुलगुरु पाटील

गडहिंग्लज : प्रतिनिधी

जागतिक तापमान वाढ अशीच राहिली, तर २०३० पर्यंत मुंबईसह अनेक शहरे पाण्याखाली जातील. त्यामुळे जागतिक तापमान वाढ थांबवावी लागेल. त्याकरिता कार्बन डाय ऑक्साईडचे उत्सर्जन थांबवणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी केले. येथील डॉ. घाळी महाविद्यालयात आयोजित राष्ट्रीय परिसंवादामध्ये बीजभाषक म्हणून ते बोलत होते.

द्वितीय सत्रात उदयराव गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. सतीश घाळी यांच्या हस्ते परिसंवादाचे उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य मंगलकुमार पाटील होते.

अनिल मगर यांनी स्वागत केले. शिवानंद मस्ती व राधिका हुलगबाळी यांनी पाहुण्यांची ओळख करुन दिला. यावेळी विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्र, भित्तीपत्रिका स्पर्धा, शोधनिबंध सादरीकरण स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये लक्ष्मीकांत वर्धापगोळ, प्रवीण पाटील, सूरज हालगडग्गी, आरती पाटील, ओंकार कांबळे, योगेश्री देसाई, अभिषेक घाटगे, सुजितकुमार देसाई, रूपेश देसाई, पूजा नेवडे यांनी यश मिळवले. अनंत पाटील, विजय सावंत, प्रवीण खराडे, नीलेश जुंगारे, एस. एल. गावडे यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. यावेळी अनिल उंदरे, आर. एस. सावंत, मिलिंद पाटील, किरण पाटील, महेश कदम, श्रीकांत पाटील उपस्थित होते. अश्विन गोडघाटे यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात रंगला 'स्वररंग'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे 'स्वररंग' हा सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात झाला. यामध्ये विभागातील विद्यार्थ्यांनी उपशास्त्रीय, सुगम गीत प्रकार, रामायणातील प्रसंगांवर आधारित भरतनाट्यम् नृत्य, एकल तबलावादन इत्यादींचे बहारदार सादरीकरण केले. शिक्षक गौरी कुलकर्णी व विद्यार्थी रोहन लाखे यांनी हार्मोनिअमची साथ केली, तर तबल्याची साथसंगत संदेश गावंदे, विक्रम परीट, सौरभ सनदी यांनी केली. कार्यक्रमाची संकल्पना व सादरीकरणास विभागप्रमुख अंजली निगवेकर, सहायक प्राध्यापक डॉ. विनोद ठाकूरदेसाई, निखिल भगत, पद्मश्री बागडेकर, शिवानी ढेरे यांचे मार्गदर्शन लाभले.

14 APR 2023 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंबेडकरी विचारात 'माणूस' केंद्रस्थानी

## जत्राटकर : बार असोसिएशनच्या वतीने व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, लेखन आणि कृतीच्या केंद्रस्थानी नेहमी सामान्य माणूस होता. सामान्यांच्या उद्धारासाठी त्यांनी सर्वस्व अर्पण केले,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील जनसंपर्क प्रमुख डॉ. अलोक जत्राटकर यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि म. जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा बार असोसिएशनच्या वतीने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.



कोल्हापुरातील न्यायसंकुलात गुरुवारी झालेल्या कार्यक्रमात डॉ. अलोक जत्राटकर यांचे व्याख्यान झाले. यावेळी ॲड. तृप्ती नलवडे, ॲड. अनुष्का कदम, ॲड. गिरीश खडके, कविता अग्रवाल, ॲड. विजयकुमार ताटे उपस्थित होते.

गुरुवारी न्यायसंकुलात व्याख्यान झाले. यावेळी बार असोसिएशनचे सचिव विजयकुमार ताटे-देशमुख यांनी स्वागत केले. बार असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश खडके यांच्या हस्ते डॉ. जत्राटकर यांचा सत्कार केला. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश कविता अग्रवाल, ॲड. अनुष्का कदम, तृप्ती नलवडे, ॲड. संकेत सावर्डेकर, ॲड. रणजित गावडे, ॲड. शिवाजीराव राणे, ॲड. प्रशांत शिंदे आदी उपस्थित होते.

14 APR 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शेती कल्याणाचे किमयागार : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**संपूर्ण देशाचा, देशातील संपूर्ण लोकांच्या उद्धाराचा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर केला म्हणून त्यांना आपण देशाचे महान नेते म्हणून समजून घेतले पाहिजे. त्यांच्या इतर बहुविध कार्याप्रमाणेच आधुनिक भारताच्या विकासावर परिणाम करणाऱ्या कृषी, जल आणि ऊर्जा या क्षेत्रांत त्यांनी केलेले कार्य अभ्यासले पाहिजे. आज डॉ. आंबेडकर यांची जयंती, त्यानिमित्त...**

सम्यक मानवमुक्तीच्या लढ्यासाठी उच्च विद्याविभूषित झालेले बाबासाहेब समाजकारण आणि राजकारणात उतरले. कायदेमंडळाच्या पातळीवर तसेच सामाजिक पातळीवर त्यांनी विविध लढे दिले. तत्त्वज्ञ म्हणून मूलगामी विचारही देशाला दिला. सर्व स्त्रिया, दलित, शोषित, शेतकरी, कामगार, भटके विमुक्त, आलुतेदार, बलुतेदारांच्या हक्कांसाठी डॉ. आंबेडकरांनी बुद्धी कौशल्याचा वापर करून लढा दिला. त्यामुळे डॉ. आंबेडकर यांना या देशाच्या सर्व प्रश्नांशी, शोषित पीडितांच्या प्रश्नांशी जोडून अभ्यासावे लागते. भारताच्या शेती प्रश्नावर मूलभूत स्वरूपाचे भाष्य करणारा 'स्मॉल होल्डिंग्स इन इंडिया अँड देअर रेमेडीज' हा लेख त्यांनी १९१८ मध्ये लिहिला. यामध्ये जमिनीच्या तुकडीकरणाचा प्रश्न मांडला. आर्थिक मिळकत ही केवळ शेतजमिनीच्या आकारावर अवलंबून नसते, तर लागवडीच्या क्षमतेनुसार शेतजमिनीचा आकार कमी-जास्त करण्यावर अवलंबून असते, असे मत या लेखात मांडले. जमिनीचे एकीकरण करून विस्तारीकरण करावे आणि छोट्या शेतकऱ्यांना विनाशापासून वाचवायचे असेल, तर विशिष्ट आकाराच्या सहकारी शेतीचा उपाय ते सुचवितात. शेतीच्या उत्पन्नाचा विचार न करताच वसूल केल्या जाणाऱ्या शेतसाऱ्यास त्यांनी विरोध दर्शविला. १८ ऑगस्ट १९२५ ला प्रसिद्ध झालेल्या शेतकऱ्यांचे प्रश्न या लेखात शेतीच्या निव्वळ काल्पनिक उत्पन्नाच्या अंदाजावरून सरसकट शेतसारा आकारणी गैर आणि अन्यायकारक आहे, अशी मांडणी त्यांनी केली.

डॉ. आंबेडकर यांनी विधिमंडळात अर्थसंकल्पावरील पहिले भाषण शेतकऱ्यांच्या प्रश्नावर केले होते. डॉ. आंबेडकर यांनी कोकण प्रांत शेतकरी संघाचे मार्गदर्शक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली. कोकणातील खोतांनी शेती असणाऱ्या कुळांना जेरीस आणले होते. खोती पद्धतीमध्ये सर्व जमीन खोतांच्या ताब्यात असे. पेशवाईत खोतांना जमिनीच्या मालकीच्या रीतसर सनदा दिल्या. ब्रिटिशांनी खोतीवतन अधिनियमाने या पद्धतीला मान्यता दिली. वरिष्ठ समाजातील वजनदार लोक खोत असत. हे खोत सावकारीही करीत. कर्जावर जबरदस्त व्याज आकारत. परतफेडीच्या पावत्या नसल्यामुळे कर्जदार कधीच कर्जमुक्त होत नसे. कोकणातील शेतकऱ्यांच्या या चळवळीचे नेतृत्व डॉ. आंबेडकर, नारायण नागू पाटील, भाई अनंतराव चित्रे, सुरबा नाना टिपणीस आणि शामराव परुळेकर अशा मान्यवरांनी केले. प्रदीर्घ असा सात वर्षे चाललेला शेतकऱ्यांचा ऐतिहासिक संप १९३३ ते १९३९ या कालावधीत कोकणात झाला. त्याअंतर्गत १६ डिसेंबर १९३४ रोजी भाई अनंतराव चित्रे यांच्या अध्यक्षतेखाली शेतकरी परिषद घेण्यात आली. मुख्य मार्गदर्शक डॉ. आंबेडकर यांच्या भाषणाने शेतकऱ्यांचा उत्साह वाढला. या आंदोलनाच्या परिणामातूनच डॉ. आंबेडकरांनी 'खोती' नष्ट करण्याचे विधेयक १७ सप्टेंबर १९३७ रोजी



मुंबई विधिमंडळात मांडले. खोतांच्या संघटनेने त्याला प्रचंड विरोध केला. १० जानेवारी १९३८ रोजी मुंबई कौन्सिलच्या असेंब्लीवर भव्य मोर्चा काढला.

जमिनीची प्रत्यक्ष मशागत करणाऱ्यालाच मेहनतीचे फळ मिळावे, खोत इनामदारांसारखे मध्यस्थ ठेवू नये, शेतकऱ्यांच्या हिताची व्यवस्था करावी, शेतकऱ्यांवर कर लावण्यापूर्वी जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांच्या चरितार्थाची योग्य सोय शासनाने करावी. शेतकऱ्यांना किमान मजुरी देण्याची कायद्याने सोय करावी. या मूलभूत मागण्या यावेळी केल्या. थकीत शेतसारा माफ करावा, कमी उत्पन्नावरील शेतसारा माफ करावा, बाजारभाव उतरले असल्याने वर्षाला ७५ रुपयांपर्यंत सारा देणाऱ्या शेतकऱ्यांना ५० टक्क्यांनी सारा कमी करावा, खोती-इनामदार पद्धती जुलमी असल्याने कायद्याने नष्ट करावी, अशा एकूण तातडीच्या तेरा मागण्या करण्यात आल्या. या संपाचा परिणाम होऊन १९४८ साली जमीन महसूल संहिता बदलली. खोती निर्मूलन अधिनियम १५ मे १९५० पासून लागू करण्यात आला. त्यामुळे एक लाख २२ हजार ८६० एकर जमीन मुक्त झाली. देशाचे पहिले पाटबंधारेमंत्री आणि पहिले ऊर्जामंत्री म्हणून त्यांनी आवश्यक असलेले धोरण ठरविले जलविकास व ऊर्जा विकासाला आधुनिक आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन प्राप्त झाला. जलधोरणाची उद्दिष्टे निश्चित झाल्यावर, दामोदर खोरे प्रकल्पाचा धाडसी निर्णय डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालीच झाला. सोननदी, हिराकुंड, टिकारपार, नीरज येथे महानदीवर धरणे उभारली गेली. पंजाबमधील छोटी-मोठी धरणे, हैदराबाद-मद्रास सरकारचे मतभेद मिटवत, तुंगभद्रा धरण, चंबळ नदी प्रकल्प, दक्षिणेकडील अनेक छोटे-मोठे प्रकल्प यांची आखणी केली. याचे श्रेय आंबेडकरांना आहे. शेती आणि शेतकऱ्यांबाबत मूलभूत विचार मांडणाऱ्या आंबेडकरांचे विचार समजून न घेतल्याने आज ते प्रश्न वाढले आहेत. आग्रही भूमिकेने व अभ्यासपूर्ण धोरणाने, सिंचनविषयक नियोजन करून जलविकासाचा पायाच त्यांनी घालून दिला. शेती आणि उद्योगाच्या विकासासाठी शून्यातून सिंचन धोरणाची उभारणी करणाऱ्या या महामानवाला शेतीवर अवलंबून असणारे देशातील सर्व घटकांनी समजून घेणे आवश्यक आहे. महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' मधून उपस्थित केलेल्या प्रश्नापासून आज शेतकऱ्यांच्या आत्महत्येसारख्या भयानक प्रश्नापर्यंत आपण येऊन पोहोचलो आहोत. आधुनिक भारताच्या विकासावर परिणाम करणाऱ्या कृषी, जल आणि ऊर्जा या क्षेत्रांत त्यांनी केलेले कार्य अभ्यासले की, त्यांना शेती कल्याणाचे किमयागारच म्हणावे लागते.

**- प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन**

(लेखक शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि विकास केंद्राचे संचालक आहेत.)

14 APR 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय रिझर्व्ह बँक


**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अर्थशास्त्रातील (D.SC.) डीएस्सीसीसाठीचा प्रबंध लंडन विद्यापीठात १९२० मध्ये सादर करतात. ज्या प्रबंधात त्यांनी भारतातील चलन व्यवस्था स्वातंत्र्यपूर्व कालावधीमध्ये हिंदू आणि मुस्लिम राज्यांच्या राजवटीत आणि ब्रिटिश कालावधीत कशी विकसित होत गेली. त्याचे विवेचन आपल्या प्रबंधात करतात. तो त्यांचा डी एस्सीसीचा प्रबंध 'प्रॉब्लेम ऑफ रुपी: इट्स ओरिजिन अँड सोल्युशन'' म्हणजेच 'भारतीय रुपयांची समस्या: उगम आणि उपाय'' होय. देशातील चलन व्यवस्थेचा, बँकिंग आणि वित्त व्यवस्थेचा अभ्यास केल्यानंतर ते भारतासाठी नेमकी कोणती चलन पद्धती योग्य हे स्पष्ट करतात.**

**डॉ. आंबेडकर आणि भारतीय रिझर्व बँक**

डॉ. आंबेडकरांनी तत्कालीन भारताच्या चलन आणि वित्त व बँकिंग व्यवस्थेचा अभ्यास केल्यानंतर, त्यांच्या हे लक्षात आले होते की आता चलनविषयक वित्त आणि बँकिंग विषयक सुधारणा करणे आपल्या देशात अत्यावश्यक आहे. ही प्रतिकूल परिस्थिती तत्कालीन ब्रिटिश सरकारच्याही लक्षात आली होती. म्हणूनच ब्रिटिश सरकारने १९२४–२५ मध्ये भारतीय चलन आणि वित्त व्यवस्थेवर रॉयल आयोगाची स्थापना करून, त्या आयोगास भारतात पाठवले. यालाच हिल्टनयंग आयोग असेही म्हटले जाते.

डॉ. आंबेडकरांनी रॉयल आयोग किंवा हिल्टन यंग आयोगाला लेखी स्वरूपात त्यांना अपेक्षित चौकटीत भारताला कोणती चलन व्यवस्था, बँकिंग आणि वित्त व्यवस्था आणि कशी असावी त्याचा प्रस्ताव अगोदरच सादर केला होता. मात्र हिल्टन यंग आयोगाने काही तज्ज्ञ व्यक्ती आणि संस्थांबरोबर चर्चा करून त्यांची मते जाणून घेतली. डॉ. आंबेडकरांना हे कळाल्यानंतर त्यांनाही आपलं म्हणणं तोंडी स्वरूपात, चर्चेच्या माध्यमातून या आयोगापर्यंत पोहोचवायचे होते. शेवटी आयोगाला भेटण्यास डॉ. आंबेडकरांना कशीबशी परवानगी मिळाली.

डॉ. आंबेडकर आणि हिल्टन यंग आयोग त्यांचे सदस्य यांच्यात चर्चा सुरू झाली. हिल्टन यंग यांच्याकडे रुपयाची समस्या हा ग्रंथ होता. ही चर्चा ऐकून ते बाबासाहेबांना म्हणाले की तुम्ही जे बोलताय, जी मते मांडताय ती सर्व या ग्रंथात आहेत. यापेक्षा वेगळे तुमचे मत आणि विचार काय आहे ते सांगा. यावर डॉ. आंबेडकर म्हणाले की, तुमच्या हातातील रुपयाची समस्या या ग्रंथाचा संशोधक आणि लेखक मी स्वतः आहे.




मात्र या ग्रंथात आणि संशोधनात समाविष्ट न झालेल्या बाबी ज्या अत्यंत महत्त्वाच्या आहेत, त्याच तुमच्यापुढे सांगण्याचा प्रयत्न मी करणार आहे.

बाबासाहेबांची या आयोगाशी झालेली चर्चा आयोगालाही महत्वपूर्ण वाटली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही समाधानी झाले कारण ते या ग्रंथा व्यतिरिक्तची माहिती आणि संशोधन या आयोगापर्यंत पोचविण्यात यशस्वी झाले. देशात मर्यादित आणि अपरिवर्तनीय कागदी चलन पद्धती स्वीकारावी. द्वियातू किंवा चांदीच्या स्वरूपातील किंवा सुवर्ण विनिमय स्वरूपातील आणि सोन्याच्या स्वरूपातील ही पैसा किंवा चलन पद्धती स्वीकारू नये असे सांगितले. सर्वात महत्वाची गोष्ट बाबासाहेबांनी या आयोगाला लेखी आणि तोंडी सुद्धा शिफारस केली ती म्हणजे एका स्वायत्त नियामकाची किंवा मंडळाची स्थापना करणे, त्यालाच नंतर मध्यवर्ती बँक असे संबोधले गेले. आणि ती म्हणजेच भारतीय रिझर्व बँक होय. लेखी प्रस्ताव आणि तोंडी झालेल्या चर्चेतून या आयोगाला सादर केलेल्या आणि सांगितलेल्या शिफारशी या आयोगाने स्वीकारल्या आणि तत्कालीन ब्रिटिश सरकारला कळविल्या. ब्रिटिश सरकारने त्या स्वीकारल्या त्यातूनच आपण अपरिवर्तनीय कागदी चलन पद्धती आणि चलन व्यवस्था वित्त व्यवस्था आणि बँकिंग व्यवस्थेचे नियमन आणि नि… करण्यासाठी स्वायत्त नियामक / नियंत्रक म्हणजेच मध्यवर्ती बँकेची स्थापना करण्याचे ठरले. यातूनच एक एप्रिल १९३५ रोजी भारतीय रिझर्व बँकेची देशाची मध्यवर्ती बँक म्हणून स्थापना करण्यात आली. अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे डी एस्सीचे संशोधन, त्यांनी हिल्टन यंग आयोगाला सादर केलेला लेखी प्रस्ताव आणि अपरिवर्तनीय स्थि… किंवा मर्यादित कागदी चलन पद्धती आणि नियामक म्हणून मध्यवर्ती बँकेची स्थापना केली त्यालाच आपण भारतीय रिझर्व बँक असे म्हणतो. म्हणूनच रिझर्व बँकेचा स्थापना दिवस एक एप्रिल आर्थिक दिवस, आर्थिक वर्षाचा पहिला दिवस म्हणून ही संपूर्ण देशभर साजरा केला जातो.

– प्रा. डॉ. पी. एस. कांबळे
अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ

Times of India

# Shivajirao Kadam gets Kanbarkar award

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur**: Dr. Shivajirao Kadam, Chancellor of Bharti Vidyapith Deemed University, was honoured with the R K Kanbarkar Award on Thursday.

Named after Shivaji University Kolhapur (SUK)'s former vice-chancellor, the award was handed over to Kadam in an event held at Rajarshi Shahu Auditorium in University premises. MP Shriniwas Patil attended as the chief guest. Vice-chancellor of SUK Digambar Shirke headed the event in the presence of Pro-vice chancellor Pramod Patil and Registrar Vilas Shinde.

A prize money of Rs1.5 lakh, a badge and a certificate was handed over to Kadam by the hands of Patil.